केस नं. रेफ.आयडीए नं.45/2018
निशाणी यु–09

**<u>शपथेवर साक्षीदाराची पुढील उलटतपासणी – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांच्याव्दारा</u>**

05. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही रोजंदारी संदेशवाहक आहोत. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी बॅकेकडे काम उपलब्ध असेल त्याच दिवशी आम्हाला कामावर बोलावण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेतील कायम संदेशवाहक कर्मचारी रजेवर असतील त्याच दिवशी आम्हाला कामावर बोलावण्यात येत होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जितके दिवस काम केले तितक्या दिवसांचाच पगार आम्हाला देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेने निवड समिती स्थापन करुन त्याव्दारे आमच्या नियुक्त्या केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, निवड समितीबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला व व्दितीयपक्षाच्या इतर कर्मचा–यांना चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणुन बॅकेने नेमणुक केलेली नाही तसेच त्याबाबतचे कोणतेही नियुक्तीपत्र आम्हाला दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रासोबत जोडलेल्या परिशिष्टातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरण या न्यायालयात येण्यापुर्वी कामगार उपायुक्त यांचे कार्यालयात चालविण्यात आले. समेट न झाल्याने सदर प्रकरण हे या न्यायालयात पाठविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही या प्रकरणात स्टेटमेंट ऑफ क्लेमसोबत परिशिष्ठ 1 ते 31 दाखल केलेले आहे व त्यातील मजकूर खोटा आहे.

06. हे म्हणणे खरे नाही की, आमची सेवा अखंड 20 वर्ष झालेली आहे याबाबत मी पुरावा दिलेला नाही. आमची संघटना भारतीय मजदूर संघाशी संलग्नीत नाही. हे म्हणणे खरे नाही की आमची सलग 20 वर्ष मॅसेंजर म्हणुन सेवा झाल्याबाबतचा कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ज्या शाखेत काम करीत आहोत त्या शाखेत शिपाई आधीच कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पक्ष क्रमांक 2 मधील बरेच कामगार 10वीं पास नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर रेफरन्स न्यायालयात आला त्यावेळेस पक्षकार क्र.2 ते 31 हे कर्मचारी 18 ते 28 या वयोगटातील नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वर्ग–4 ॲटेन्डंट या पदाकरीता बॅकेकडे आम्ही अर्ज केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, बॅकेच्या ऑफिस ॲटेन्डंट पदाच्या नियुक्तीकरीता जी

नियमावली नमूद करण्यात आली आहे त्यात शिक्षण 10वी पास व वय 18 ते 28 असावे असे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही सदर पात्रता पुर्ण करीत नाहीत. साक्षीदार सांगतो की, तो ज्यावेळेस बॅकेत लागला त्यावेळेस सदर पात्रता अस्तित्वात नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नोकरीस लागलो त्यावेळेसचे वय स्टेंटमेंट ऑफ क्लेम मध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरआरबी अपॉईंटमेंट ऑफ ऑफिसर्स ॲण्ड एम्लॉईज रुल्स 2017 मध्ये प्युन–कम–मॅसेंजर असे पद नाही. साक्षीदार सांगतो की, यापुर्वी अस्तित्वात असलेल्या नियमावलीत ते पद होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर नियमावली मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर पद अस्तित्वात नसल्यामुळे आम्हाला त्या पदावर कायम करता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची सलग 240 दिवस सलग सेवा झाल्याबाबत आम्ही खोटे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतचा कोणताही पुरावा आम्ही सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नियमावलीत पद नमूद नसल्यामुळे बॅकेला आम्हास कायम करता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पद अस्तित्वात नसल्यामुळे 240 दिवस काम केल्याचा फायदा आम्हास मिळू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रकरणात जी कागदपत्र दाखल केलेली आहेत ती खोटी व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे स्टेटमेंट ऑफ क्लेम दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पक्षकार क्र.1 ने दिलेले नियुक्तीपत्र मी प्रकरणात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमची नेमणुक बॅकेने मॅसेंजर म्हणुन केल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या परिच्छेद क्र.6 मध्ये नमूद केलेली कामे बॅकेने मला कधीही दिलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्रात सदर कामे बॅक आम्ही व्दितीयपक्षास सांगत होती असा मजकूर नमूद आहे. साक्षीदार सांगतो की, तो मजकूर बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरहजर राहील्यास आमचा पगार बॅकेत कापला जातो. हे म्हणणे खरे नाही की, पगार कापला जात नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची नियुक्ती ही विहीत पध्दतीने झालेली नसल्याने कायम कर्मचा–यांचे फायदे आम्हास मिळू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शैक्षणिक व वयाची पात्रता पुर्ण करीत

नसल्यामुळे आम्हाला सेवेत कायम करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुठल्याही हक्काची पायमल्ली बॅकेने केलेली नाही.

07. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सारख्या कर्मचा–यांना रु.35000/– पगार दिला जातो हे दाखविणारे कागदपत्र मी दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कायम कर्मचा–यांइतके काम करीत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेने जाणीपुर्वक पक्षपातीपणा केलेला नाही तसेच कोणत्याही इतर कर्मचा–याची पाठराखण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कायम कर्मचारी नसल्यामुळे कायम कर्मचा–याला मिळणारे आर्थिक लाभ व फायदे मिळण्यास आम्ही पात्र नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी बॅकेला मागणीपत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे उत्तर बॅकेने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, लेबर कमीशनर यांचेसमोर बॅकेने आमची मागणी अमान्य केली होती. हे महणणे खरे आहे की, लेबर कमीशनर समोर आम्ही कर्मचारी तसेच बॅकेचे लोकही येत होते. हे म्हणणे खरे नाही की, बॅकेने हटवादीपणाची भुमिका घेतली व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा विपर्यसत अर्थ लावला असे मी खोटे सांगत आहे. बॅकेने कुठल्या निकालाचा विपर्यस्त अर्थ लावला ते आता मला सांगता येणार नाही.

08. हे म्हणणे खरे नाही की, माझी व इतर कर्मचा–यांची नोकरीत कायम करण्याची मागणी ही अवास्तव असल्याने समेटाची कारवाई असफल ठरली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कायम कामगार आम्हास सुडबुध्दीने वागवितो असा परिच्छेद क्र. 13 मध्ये जो मजकूर नमूद आहे तो खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही की, सदर परिच्छेदातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, या दाखल प्रकरणाच्या व्यतिरिक्त कर्मचा–यांची गुत्तेदार पध्दतीने नेमणुक केल्याबाबत मी कुठेही तक्रार/प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रथमपक्षाने आम्हाला कायम हंगामी ठेवल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्राच्या परिच्छेद क्र.14 मध्ये मी खोटे आरोप केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हीस कंडीशन्स बदलल्याबाबत मी बॅकेविरुध्द कोणतीही कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ठेकेदाराकडे काम करण्याबाबत पक्षकार क्र.1 ने दबाव आणल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत कोणतेही प्रकरण मी दाखल केलेले

केस नं. रेफ.आयडीए नं.45/2018
निशाणी यु–09

नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्राच्या परिच्छेद क्र.17 मध्ये मी बॅकेविरुध्द खोटे आरोप केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वैयक्तीकरित्या दाखल केलेले असुन युनियनमार्फत दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्दितीयपक्ष कामगार प्रथमपक्षाच्या शाखेत काम करतात असे झालेले नाही. साक्षीदार सांगतो की त्याबाबत शपथपत्राच्या परिच्छेद क्र.18 मध्ये चुकीने मजकूर नमूद केलेला आहे. हे म्हाणणे खरे आहे की, आम्ही आमच्या युनियनची घटना या प्रकरणात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही युनियनचे सभासद असल्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आमची संघटना कामगारांचे हित जोपसण्याचे काम करते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेली सर्व कागदपत्रे ग्राहय धरता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रथमपक्ष बॅक आम्हास कायम करु शकत नाही, तसेच कायम कामगारांचे फायदे देवु शकत नाही व कायम कामगाराचे फायदे देवु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही माहिती न देता सरतपासणीचा खोटा मजकूर तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास – पुर्ण.**

**फेरतपास – नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–

दिनांकः 21.02.2023
ठिकाणः औरंगाबाद

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
पिठासीन अधिकारी,
2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.